# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### हिंगोली येथे राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (NEET) साठी परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्याबाबत

**(१) २९१२ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली हे जिल्ह्याचे मुख्यालय असूनही या ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून नीट परिक्षेकरीता परीक्षा केंद्र (NET center) सुरू करण्यात आले नसल्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली येथे पुढील शैक्षणिक वर्षात नीट परिक्षेकरीता परीक्षा केंद्र(NET center) सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२२-०६-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता नीट युजी ही पात्रता परीक्षा राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (National Testing Agency), नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येते तसेच परीक्षा केंद्र निवडी संदर्भातील संपूर्ण कार्यवाही राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (National Testing Agency), नवी दिल्ली यांचेमार्फत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे शीळ (ता.जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील भूखंडावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(२) ४३७० (१०-०७-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शीळ (ता.जि.ठाणे) येथील सर्व्हे नंबर ९१,९१/१ एम.आय.डी.सी.च्या भूखंडावर तसेच शीळ खर्डी, खान कंपाऊंड, महापे रोड येथे भुमाफियांव्दारे झालेल्या अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी

कार्यालय, अंधेरी पूर्व यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरील प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१०-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १३/०५/२०२५ रोजीचे निवेदन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्राप्त झाले आहे.

(२) मौजे शीळ, ता.जि.ठाणे येथील सर्वे नंबर ९१,९१/१ हे म.औ.वि. महामंडळाच्या संपादित केलेल्या क्षेत्राबाहेरील आहेत. तसेच शीळ-महापे रस्त्याच्या हद्दीबाहेरील शीळ खर्डी,खान कंपाऊंड येथे बांधण्यात आलेली अनधिकृत बांधकामे सुध्दा म. औ. वि. महा- मंडळाच्या संपादित क्षेत्राबाहेरील आहेत.

म.औ.वि. महामंडळाच्या टिटिसी औद्योगिक क्षेत्राबाहेरील भागात मौजे शीळ, ता.जि.ठाणे येथील सर्वे नंबर ७२, ७३, ८२ व ९७ मधून संपादित केलेल्या शीळ महापे रस्त्याच्या ६१ मीटर रुंदीमध्ये प्रथम दर्शनी काही अनधिकृत बांधकामे झाली असल्याचे निदर्शनास येत आहे.

सन २०२५ च्या प्रथम अधिवेशनातील लक्षवेधी सूचना क्र.२५० वरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार मा.राज्यमंत्री (उद्योग) यांनी मौजे शीळ, सर्व्हे क्र. ९७/१ व ९७ या मऔवि महामंडळाच्या जागेवरील अतिक्रमणग्रस्त ठिकाणी दिनांक ०२/०४/२०२५ रोजी स्थळ पाहणी केली. तसेच, त्यांचे अध्यक्षतेखाली मऔवि महामंडळाच्या महापे, टिटिसी औद्योगिक क्षेत्र, नवी मुंबई कार्यालयात दुपारी १२.०० वाजता बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीतील निर्णयानुसार मऔवि महामंडळ, ठाणे महानगरपालिका, पोलीस विभाग व वन विभागाच्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी संयुक्त मोहिम राबवून मऔवि महामंडळाच्या शीळ महापे रस्त्याच्या हद्दीतील चालु स्थितीतील तळमजला + ३ मजले असलेल्या इमारतीचा भाग दिनांक २२/०४/२०२५ रोजी निष्कासित करण्यात आला आहे. तथापि, या इमारतीचा उर्वरित भाग तसेच सदर परिसरातील शीळ, खर्डी, खान कंपाऊंड या ठिकाणचे अनधिकृत इमारतींचे बांधकाम हे मऔवि महामंडळाच्या शीळ महापे रस्त्याच्या हद्दीबाहेर असल्याने तो निष्कासीत करणे मऔवि महामंडळाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

मऔवि महामंडळाच्या भूखंडावर अतिक्रमण होऊ नये याकरीता महामंडळाचे अधिकारी वारंवार या ठिकाणी भेट देवून आवश्यकतेनुसार संबंधित यंत्रणांच्या सहकार्याने अतिक्रमण निष्काशीत करण्याची कारवाई वेळोवेळी करीत असतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावनेर (जि.नागपूर) औद्योगिक विकास महामंडळाध्ये प्रस्तावित प्रकल्पास मान्यता मिळण्याबाबत

**(३) ४८८३ (१४-१२-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रिय खत व रसायन मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सावनेर येथे रुपये १० हजार कोटीचा १२.७ लाख मेट्रीक टन क्षमतेचा प्रकल्प प्रस्तावित केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाच्या केंद्रिय मंत्रीमंडळाच्या अंतिम मंजुरीकरीता राज्य शासनाने प्रस्ताव सादर केला आहे काय, सदरील प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१०-०६-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

गेल (इंडिया) या कंपनीने खत व रसायन या उत्पादनाकरीता सावनेर (जि.नागपूर) येथील जागेची दिनांक १८/११/२०२५ रोजी पाहणी केली असून, भूसंपादनास लागणारी व इतर माहितीबाबत पाठपुरावा सुरु आहे. या अनुषंगाने माहिती व प्रस्ताव प्राप्त होताच आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयांतील शालेय शिक्षकांच्या गुणगौरव कार्यक्रमाचे ढिसाळ नियोजन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४) ४८९६ (१७-१२-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाकडून जिल्हास्तरावर समर्पितपणे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी दिनांक ५ सप्टेंबर, रोजी "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार" वितरण कार्यक्रम आयोजित केला जातो, परंतु यावर्षी अनेक जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम दिनांक ५ सप्टेंबर रोजी घेण्यात आला नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात सदर कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये मोठ्या प्रमाणात हलगर्जीपणा आढळून आला असून, सत्कारमूर्ती शिक्षकांसाठी योग्य आसन व्यवस्थाही करण्यात आली नव्हती व अनेकांना बसण्यासाठी खुर्च्याही उपलब्ध करून देण्यात आल्या नव्हत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अध्यापनाचे पवित्र काम करणाऱ्या शिक्षकांच्या सत्काराच्या पवित्र कार्यक्रमाचे ढिसाळ नियोजन करणाऱ्या व शिक्षकांचा अपमान झाल्याबद्दल संबंधित अधिकारी/पदाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२९-०६-२०२६) :** (१) जिल्हास्तरावर समर्पितपणे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी दिनांक ५ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद स्तरावर देण्यात येणारा पुरस्कार हा "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार" नसून, "जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार"

आहे. तथापि, सन २०२५ मध्ये दिनांक ५ सप्टेंबर रोजी ईद, दिनांक ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी व दिनांक ७ सप्टेंबर रोजी रविवारची सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे बहुतांश जिल्हा परिषदांमध्ये सदर पुरस्कार वितरण सोहळा दिनांक ५ सप्टेंबर, २०२५ ऐवजी अन्य सोयीच्या दिवशी आयोजित करण्यात आलेला आहे.

(२) व (३) जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत पंचायत विभाग व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२/०९/२०२६ रोजी प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृह, चंद्रपूर येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय एक दिवसीय कार्यशाळा, आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण सोहळा, संपूर्णता अभियान सन्मान पुरस्कार वितरण सोहळा व जिल्हा शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा या कार्यक्रमांचे एकत्रितरित्या आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमांतर्गत एकूण १७ जिल्हा परिषद शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास कुठलीही अव्यवस्था झाली नसून याबाबत कुठलीही तक्रार जिल्हा परिषदेस प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात राबविण्यात येणाऱ्या स्मार्ट व्हिलेज प्रकल्पाबाबत

**(५) ५९०० (१४-१२-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने प्रत्येक तालुक्यात १० गावे निवडून त्यांना “स्मार्ट व इंटेलिजंट व्हिलेज” बनविण्याचा कार्यक्रम हाती घेतल्याचे जाहीर केले असून सदर योजनेचा पहिला प्रायोगिक प्रकल्प नागपूर जिल्ह्यातील सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पाणी शुद्धीकरण, स्मार्ट शाळा, स्मार्ट आरोग्य सुविधा, ड्रोनद्वारे किटकनाशके फवारणी, स्मार्ट सिंचन, “बँक ऑन व्हील” सारख्या १८ सेवा एकत्रितपणे कार्यान्वित करण्यात आल्या असून हे गाव देशातील पहिले “स्मार्ट व इंटेलिजंट व्हिलेज” ठरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातनवरी गावाच्या यशस्वी मॉडेलवर आधारित इतर ३ हजार ५०० गावांमध्ये हाच नमुना राबविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने नियोजन, निधी वाटप, तांत्रिक समन्वय यासंबंधी कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती गावांमध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०८-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) “स्मार्ट व इंटेलिजंट व्हिलेज” प्रकल्पासाठी राज्य शासन, जिल्हा प्रशासन आणि VOICE (Voice of Indian Communication Technology Enterprises) या संस्थांच्या समन्वयातून तांत्रिक आराखडा तयार करण्यात आला आहे.

• पायलट प्रकल्पानंतर नागपूर, अमरावती, हिंगोली, पुणे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील ७५ गावांमध्ये विस्तारास शासन मान्यता देण्यात आली आहे.

• या योजनेंतर्गत डिजिटल शिक्षण, टेलिमेडिसिन, स्मार्ट शेती, सेन्सर-आधारित सिंचन, CCTV, Wi-Fi,

ई-गव्हर्नन्स, नूतनीकरणक्षम ऊर्जा इत्यादी सुविधा पुरविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

• भांडवली खर्च राज्य शासनामार्फत करण्याची तर संचालन खर्च स्थानिक स्वयंपूर्णता व भागीदारीतून उचलण्याची रूपरेषा शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२४२५/प्र.क्र.१६३/मातंक दिनांक ३० एप्रिल, २०२६ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

(३) आतापर्यंत प्रत्यक्ष अंमलबजावणीचे पहिले मॉडेल नागपूर जिल्ह्यातील सातनवरी गाव येथे पूर्ण करण्यात आले आहे. त्यानंतर राज्य शासनाने पुढील टप्प्यात खालीलप्रमाणे ५ जिल्ह्यांतील एकूण ७५ गावांमध्ये "स्मार्ट व इंटेलिजंट व्हिलेज" योजना राबविण्यास मान्यता दिली आहे.

१. जि.नागपूर, ता.काटोल - १० गावे

२. जि.अमरावती, ता.चांदूर बाजार - २३ गावे

३. जि.हिंगोली, ता.कळमनुरी - ११ गावे

४. जि.पुणे, ता.बारामती - १० गावे

५. जि.सिंधुदुर्ग, ता.वैभववाडी - २१ गावे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## असंघटीत सिनेकलाकारांसाठी आर्थिक सहाय्य करणाच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६) ५९१८ (१७-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असंघटीत सिनेकलाकारासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी शासनाने सन २०२३मध्ये घेतलेल्या निर्णयाची कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आझाद मैदान, मुंबई येथे उपोषणा दरम्यान सिनेसृष्टी कलाकारांना माहे जुलै, २०२५ मध्ये मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी चौकशी केली असता शासनाने सन २०२३ मध्ये मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांचे आदेश असतानाही शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सन २०२३ मधील जारी केलेल्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (२३-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही,

असंघटीत सिनेकलाकारांना आर्थिक व इतर सहाय करण्याबाबत शासनाने सन २०२३ मध्ये निर्णय घेतलेला नसून, शासनाने चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील मालक/निर्माते यांची जबाबदारी आणि कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याकरीता मानक कार्यप्रणाली (SOP) दिनांक १४/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्गमित केलेली आहे.सदर मानक कार्यप्रणालीची (SOP) संबंधित घटकांकडुन अंमलबजावणी होण्याकरीता चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील मालक / निर्माते, दिग्दर्शक तसेच चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचारी / कामगार / कलाकारांचे नेतृत्व करणाऱ्या संघटना / फेडरेशन यांना आणि इतर सर्व संबंधितांना सदर मानक कार्यप्रणालीची (SOP)

प्रत पाठवून मानक कार्यप्रणालीची तंतोतंत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

मा.मंत्री (कामगार) यांनी दिलेल्या निर्देशानुसार आणि मानक कार्यप्रमाणालीच्या (SOP) अंमलबजावणीबाबत प्राप्त ११५ तक्रारीच्या अनुषंगाने, क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन ०७ तक्रारीमध्ये सिने कलाकार/कामगार यांना आर्थिक लाभापोटी रक्कम रुपये ७,१२,८२०/- देण्यात आलेली असून, क्षेत्रिय निरिक्षकांमार्फत ०२ आस्थापनांविरुध्द किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ च्या तरतुदीनुसार मा.अतिरिक्त मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी, अंधेरी, मुंबई यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच मा.मंत्री (माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य), मुंबई यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन, सर्व संबंधितांना मानक कार्यप्रणालीची (SOP) अंमलबजावणी करण्यासाठी लेखी निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) शासनाने चित्रपट व इतर करमणुक क्षेत्रातील मालक/निर्माते यांची जबाबदारी आणि कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याकरीता महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील चित्रीकरणासंदर्भात निर्माते/ सिनेकामगार/ कलाकार/ कामगार संघटना यांच्यातील वादविवाद, अडचणी, इत्यादीच्या तक्रारीकरीता महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, यांचेमार्फत मा.व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/०३/२०२५ रोजीच्या आदेशान्वये "तक्रार निवारण समिती" तसेच मानक कार्यप्रणालीमध्ये (SOP) नमूद केलेल्या तरतूदीचे पालन चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील मालक / निर्माते यांचेकडून होते की नाही आणि मानक कार्यप्रणालीनुसार (SOP) सिनेकलाकार/ कामगार यांना लाभ व न्याय मिळण्यासाठी तसेच मानक कार्यप्रणालीची (SOP) तंतोतंत अंमलबजावणी करण्याकरीता विविध विभागातील (कामगार विभाग, सांस्कृतिक विभाग व गृह विभाग) संबंधित अधिकारी यांची मा.कामगार आयुक्त यांचे अधिपत्याखाली दिनांक २२/०९/२०२५ रोजी 'संयुक्त समिती' गठित करण्यात आलेली आहे. सदर संयुक्त समितीची मानक कार्यप्रणालीची (SOP) अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक २७/०५/२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील बालविवाह प्रथा नष्ट करण्याकरीता धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत

**(७) ६०३१ (२२-१२-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालविवाह प्रथेमुळे शाळेतून मुलींचे प्रमाण कमी होणे, कमी वयात गर्भधारणा आणि कुपोषण अशा या सर्व दुष्परिणामांना आळा बसण्यासाठी सदर प्रथा समूळ नष्ट करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत धोरणात्मक निर्णय घेण्यांत येणार असून याकरीता दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मंत्रालयात मा.मंत्री, महिला व बालविकास महोदयायांच्या अध्यक्षतेखाली युनिसेफचे मुख्य कार्यकारी अधिकारी, बालसंरक्षण तज्ज्ञ अल्पा वोरा, न्युट्रीशीयन तज्ज्ञ यांचेसह संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात आले त्यामध्ये पुढील रुपरेषा ठरविण्यांत येत असल्याचे तसेंच कुपोषण रोखण्यासदेखील

त्यांचे सहकार्य होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त बैठकीच्या अनुषंगाने बालविवाह प्रथा समुळ नष्ट करून किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण व उच्च शिक्षणात त्यांचे वाढते प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने तसेच कमी वयातील गर्भधारणा व कुपोषण रोखण्यासंदर्भात पुढील कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१८-०६-२०२६) :** (१) व (२) अशा प्रकारची कोणतीही बैठक आयोजित करण्यात आलेली नाही.

तथापि, राज्यामध्ये बालविवाह रोखण्यासाठी केंद्र शासनाचा बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ कार्यान्वित आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २०२२ तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यात बालविवाह रोखण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील ग्रामीण भागासाठी ग्राम सेवकांना तसेच नागरी भागासाठी नागरी बालविकास प्रकल्प अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात बाल विवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच त्यांना सहाय्य करण्यासाठी अनुक्रमे अंगणवाडी सेविका व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी घोषित करण्यात आलेले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षा मार्फत बाल विवाहाच्या प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन नियमितपणे करण्यात येते.

केंद्र शासनाच्या "बाल विवाह मुक्त भारत अभियान" या मोहिमेंतर्गत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये बाल विवाह प्रथा संपूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी मोहिम राबविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नवीन कामगार नियमांच्या बदलाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(८) ६५७२ (१७-०३-२०२६) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारने जाहीर केलेल्या नवीन लेबर कोड्‌समुळे (कामगार कायदे) 'फिक्स्ड टर्म कर्मचाऱ्यांना आता केवळ एक वर्षाच्या सेवेनंतर ग्रॅच्युइटी मिळण्याची तरतूद करण्यात आली असून याचा फायदा खाजगी क्षेत्रातील लाखो कर्मचाऱ्यांना होणार आहे परंतु केंद्र शासनाने कायदा करूनही राज्य शासनाच्या स्तरावर होणाऱ्या विलंबामुळे बहुतांश कंपन्या अजूनही '५ वर्षानंतरच ग्रॅच्युइटी' या जुन्याच नियमावर ठाम असल्याची बाब दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे राज्यात कंत्राटी किंवा ठरावीक कालावधीसाठी काम करणारे तरुण केंद्र शासनाच्या नवीन लेबर कोडसच्या लाभापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि केंद्र शासनाने जाहीर केलेल्या नवीन लेबर कोड्‌सची (कामगार कायदे) राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा -३ अंतर्गत प्रलंबित प्रस्ताव मान्य करण्याबाबत

**(९) ६७३३ (१७-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा -३ मधून मुख्य अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना पुणे यांनी नाशिक जिल्ह्यातील रस्त्याच्या कामांचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे पाठवलेले प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ३ मधील रस्त्यांची कामे मंजूरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.जयकुमार गोरे (११-०६-२०२६) :** (१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील एकूण ३१ रस्त्यांच्या कामांचे प्रस्ताव मुख्य अभियंता (प्रमंग्रासयो), पुणे यांच्यामार्फत शासनास प्रस्तावित करण्यात आले आहेत.
(२) राज्यातील अस्तित्वात असलेल्या व दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी, मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक १६/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ व टप्पा-२ च्या धर्तीवर, राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ या योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असून त्याअंतर्गत २३,००० किमी लांबीच्या रस्ते व पुलांची कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.
तथापि, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/१२/२०२४ रोजीच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत प्रगतीत असलेल्या कामांचे दायित्व विचारात घेऊन, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ मधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी निधी उपलब्धतेची निश्चिती करण्यात यावी व त्याकरीता बाह्य अर्थसहाय्य, जसे आशियाई विकास बँक (ADB) व इतर वित्तीय संस्थेबरोबर Financial Tie Up करण्यात यावे, असे निर्देश सदर बैठकीदरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. त्यानुषंगाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ मधील कामे निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ (ता.खुलताबाद) येथील भोसले घराण्यातील समाधीच्या दुरावस्थेबाबत

**(१०) ६७४६ (१७-०३-२०२६) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेरुळ (ता.खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर) येथे भोसले घराण्यातील आद्य पुरुष बाबाजी राजे भोसले, मालोजी राजे भोसले व विठोजी राजे भोसले यांची समाधी स्थळे असून, ती छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वजांची ऐतिहासिक वारसास्थळे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाधी स्थळांची पडझड, परिसरात वाढलेली झाडे-झुडपे, अस्वच्छता तसेच वाढलेली अतिक्रमणे यामुळे या ऐतिहासिक स्थळांचे विद्रुपीकरणाबाबत जिल्हा प्रशासन व संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सकल मराठा समाज तसेच इतिहास प्रेमी व शिवप्रेमींनी जिल्हाधिकारी व पुरातत्त्व विभागाकडे तातडीने संवर्धन व अतिक्रमणे हटविण्याबाबत निवेदने देऊनही ऐतिहासिक वारसास्थळांचे जतन व संवर्धन होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वजांची ऐतिहासिक वारसास्थळे यांचे जतन व संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

वेरुळ येथील घृष्णेश्वर मंदिर (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) परिसरात भोसले घराण्याशी संबंधित तीन ऐतिहासिक समाधी स्थळे आहेत.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

घृष्णेश्वर मंदिर या स्मारकाचे १३ एकर २ गुंठे क्षेत्र हे केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांच्या अखत्यारीत केंद्र संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. या स्मारकाच्या संरक्षित क्षेत्रात भोसले घराण्याशी संबंधित दोन समाध्यांचा समावेश आहे. परंतु मंदिराच्या बाजूस असलेल्या मंगल कार्यालयाच्या जवळ असलेली तिसरी समाधी ही असंरक्षित स्मारक आहे.

घृष्णेश्वर मंदिर परिसरातील अतिक्रमण हटविण्याबाबतची कार्यवाही भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांच्या मार्फत मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहाय्याने सुरु आहे.

(४) केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, संभाजीनगर मंडळ यांनी दिनांक २३/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये घृष्णेश्वर मंदिराचे रुपये ६८,१८,०१८/- इतक्या रकमेचे जतन दुरुस्ती काम प्रगतीपथावर असल्याचे कळविले आहे. तसेच मंदिर परिसरातील एका छत्रीच्या जतन संवर्धनासाठी रुपये ९०,००,०००/- इतक्या रकमेच्या प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक मा.महासंचालक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेकरीता सादर केले असल्याबाबत कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहती कार्यान्वित करण्यासाठी अभ्यासगट तयार करण्याबाबत

**(११) ६७७८ (१७-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहती संपूर्ण कार्यान्वित करण्यासाठी अभ्यासगट तयार करून त्याच्या अहवालाच्या आधारे कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ मार्च २०२५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१८-०६-२०२६) :** (१)होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहती पुनरुज्जीवीत करण्यासाठी विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन केलेला आहे. सदर अभ्यासगटामध्ये सह संचालक (नगररचनाकार विभाग, मैत्री कक्ष, मुंबई), तांत्रिकी सल्लागार (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई), जिल्हा उप निबंधक, (जिल्हा उप निबंधक कार्यालय, मुंबई), अतिरिक्त उद्योग संचालक (उद्योग संचालनालय, मुंबई) हे सदस्य आहेत. तसेच अध्यक्ष (महाराष्ट्र राज्य सहकारी औद्योगिक वसाहत फेडरेशन मर्यादित, सांगली) हे विशेष निमंत्रित असून उद्योग सह संचालक (उद्योग संचालनालय, मुंबई) हे सदस्य सचिव आहेत.

राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहती पुनरुज्जीवीत करण्याच्या अनुषंगाने सदर अभ्यास गटाकडून सुचविण्यात आलेल्या सूचना व शिफारशी विचारात घेऊन उद्योग संचालनालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात रस्त्यामधील मधोमध विजेच्या खांबामुळे वाहतुकीला अडचणीं येत असल्याबाबत

**(१२) ७२३२ (२४-०३-२०२६) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात अनेक ठिकाणी रस्त्याच्या मधोमध जुने काळातले विजेचे खांब असून शहरातील वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होत असून अनेकवेळा त्यामुळे अपघात सुध्दा होत असून महावितरण व पी.डब्लू.डी. स्थानिक प्रशासन यांच्या वादात रस्त्यावर मधोमध असलेले विद्युत खांब काढण्याचा निर्णय अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील रस्त्याच्या मधोमध आलेले विद्युत खांब कायमस्वरूपी काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) लागू नाही.

शहरातील रस्ता रुंदीकरणामुळे पूर्वी रस्त्याच्या कडेला असलेले विद्युत खांब रस्त्याच्या मध्ये आल्यास, त्या विद्युत खांबांचे स्थलांतर करण्यासाठी रस्ता रुंदीकरण करणाऱ्या विभागाकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर महावितरणतर्फे आवश्यक अंदाजपत्रक मंजूर करण्यात येते. महावितरणच्या देखरेखीखाली संबंधित विभागातर्फे मंजूर अंदाजपत्रकानुसार स्वखर्चाने विद्युत खांबांचे स्थलांतर करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात फळांच्या वाईन निर्यातीला मूल्यवर्धित कराचा परतावा मिळणेबाबत

**(१३) ७२६१ (१७-०३-२०२६) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात द्राक्षे आणि सफरचंदांच्या वाईनला मूल्यवर्धित कराच्या १६ टक्के कराच्या रकमे इतका परतावा देण्यात येतो मात्र हापुस, जांभूळ आणि काश्मिरी सफरचंदाच्या वाइनला परदेशात मागणी असतानाही या फळांच्या वाईनसाठी मूल्यवर्धित कराच्या रकमेचा परतावा मिळत नसल्याने या फळ उत्पादकांना निर्यातीचा फायदा घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हापुस, जांभूळ या फळांच्या वाईन निर्यातीसाठी शासन परतावा देण्याबाबत तसेच फळ उत्पादकांमध्ये निर्माण झालेला हा भेदभाव दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१०-०६-२०२६) :** (१) राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरीता द्राक्ष लागवडीस प्रोत्साहन देणे, सुकामेवा बनविणे तसेच द्राक्षापासून आर्थिकदृष्ट्या अधिक लाभदायी पर्यायी उत्पादनांची निर्मिती व्हावी तसेच द्राक्षावर आधारीत वाईन उद्योगास प्रोत्साहन म्हणून शासनाने द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण घोषित केले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून द्राक्षापासून निर्मित वाईन उद्योगांना राज्यामध्ये उत्पादित केलेल्या व अंतिमत: विक्री झालेल्या वाईनच्या विक्रीवर देय असलेला २० टक्के मुल्यवर्धीत कर भरल्यास त्यापैकी १६ टक्के कराचा परतावा देण्यात येतो.

(२) प्रचलित वाईन उद्योग प्रोत्साहन योजनेत द्राक्षांपासून वाईन उत्पादित करणाऱ्या घटकांसोबतच राज्यात उत्पादित फळे, फुले व मध यापासून वाईन उत्पादन करणाऱ्या घटकांचा समावेश करुन एकात्मिक धोरण आणून त्यांतर्गत या घटकांना प्रोत्साहने देय करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे वीजदेयक थकल्याने वीजपुरवठा खंडीत केल्याबाबत

**(१४) ७८६५ (१७-०३-२०२६) श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर पंचायत समितीच्या (जि.ठाणे) बांधकाम विभागाचे नऊ महिन्यांचे ७० हजारांचे वीजदेयक थकल्याने वीज वितरण कंपनीने वीजपुरवठा खंडीत केला असून गेल्या अनेक दिवसांपासून संगणकीय कामकाज पूर्णत: ठप्प झाले असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिजिटल प्रशासन, ई-ऑफीस, पारदर्शक कारभार केला जात असताना दुसरीकडे साधे वीजदेयक न भरल्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शहापूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे माहे एप्रिल,२०२५ ते डिसेंबर,२०२५ असे नऊ महिन्यांचे सुमारे ७० हजार रुपयांचे विजदेयक थकले असून शहापूर बांधकाम विभागाकडून ठाणे जिल्हा परिषदेकडे वीजदेयकांसह अन्य खर्चासाठी वारंवार मागणी होत असल्याने प्रशासकीय कामकाज करण्यात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेने थकीत देयक देण्यासाठी निधी न देण्याची कारणे काय तसेंच याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२३-०६-२०२६) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

शहापूर पंचायत समितीच्या बांधकाम उप विभागाचे माहे मार्च २०२५ ते डिसेंबर २०२५ पर्यंतचे रुपये ६७४४०/- चे वीज देयक थकल्याने वीज वितरण कंपनीने दिनांक ३०/१२/२०२५ रोजी वीजपुरवठा खंडित केला होता.त्याच दिवशी कार्यालयाने वीज कंपनीच्या उप अभियंत्याला विनंती करून दिनांक ३१/१२/२०२५ रोजी वीज जोडणी पूर्ववत केली व कामकाज सुरळीतपणे सुरू राहिले.

(२) हे खरे नाही.

वीज पुरवठा खंडीत केला तरीही कार्यालयीन कामकाज बॅटरी बॅकअपवर सुरू होते.

(३) बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे मुख्यालय व उपविभाग कार्यालयासाठी अधीक्षक अभियंता,ठाणे (सा.बां.) मंडळ ठाणे या सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन कार्यालयीन सादील व प्रवास भत्या करीता २०५९-०६७९(३१) वेतनेतर या लेखाशिर्षा खाली रुपये १०,५०,०००/- इतका निधी प्राप्त झाला होता.सदर निधी कोषागारातुन आहरित करण्या पूर्वीच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने वीज खंडीत करणेची नोटीस दिल्याने तातडीची बाब म्हणून जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतुन शहापुर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे थकीत वीज देयक भरणा करणेसाठी रक्कम रुपये ९०,०००/- इतका निधी उपलब्ध करुन रुपये ७१,८६०/-वीजदेयक भरणा करण्यात आल्याने प्रशासकीय कामकाज अडचणी निर्माण झाल्या नाहीत.

(४) अशी बाब नाही. बांधकाम विभागाकडुन रुपये ९०,०००/-इतका निधी उपलब्ध करुन थकीत विजदेयक रुपये ७१,८६०/-भरणा करण्यात आला आहे.
(५) अशी बाब नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील एमआयडीसीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१५) ७९७४ (१७-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यात ५०० एकर जागेवर एमआयडीसी उभारण्याचे प्रस्तावित असताना प्रत्यक्षात केवळ १०० एकरवरच ही प्रक्रिया राबविली जात असून याबाबत प्राथमिक सर्वेक्षण व रेखांकनात अद्याप प्रगती झाली नसल्याची बाब दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक वसाहतीअभावी स्थानिक युवकांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असून तालुक्याच्या औद्योगिक,आर्थिक विकासावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औद्योगिक क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीकोनातून एमआयडीसीचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उदय सामंत (१७-०६-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

प्रस्तावित मुक्ताईनगर औद्योगिक क्षेत्राकरीता मौजे हरताळे व निमखेडी खुर्द, ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव येथील खाजगी १०१.४७ हे. आर क्षेत्रास अधिनियम-१९६१ चे प्रकरण-६ च्या तरतूदी लागू करणेबाबत शासनास दिनांक ०८/१२/२०२३ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता.परंतु सदर प्रस्तावानुषंगाने शासनामार्फत दिनांक २७/०२/२०२४ रोजीचे पत्रान्वये १०१.४७ हे. आर क्षेत्र मऔवि अधिनियम १९६१ अंतर्गत अधिसूचित करण्याकरीता जलसंपदा विभागाचे स्पष्ट ना-हरकत प्रमाणपत्र सादर करुन त्यानुसार अभिप्रायासह अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तद्नुषंगाने ना-हरकत घेणेबाबत संबंधित विभागास विनंती केली असता, बोदवड परिसर सिंचन योजनेच्या लाभ क्षेत्रातुन नमुद ५० गटांचे क्षेत्र वगळून औद्योगिक विकासासाठी संपादीत करणेबाबत संबधीत खातेदाराकडून संमती घेण्याच्या अटीस अधीन राहून ना-हरकत देण्यात आली आहे.

बोदवड परिसर सिंचन योजनेच्या लाभ क्षेत्रातील ५० गटांच्या खातेदारांची संमती घेण्यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांना प्राधिकृत करण्याकरीता जिल्हाधिकारी, जळगांव यांना दिनांक १५/०७/२०२५ रोजीचे पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. सदर मंजूरी प्राप्त होताच म.औ.वि.अधिनियम-१९६१ नुसार भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सार्वजनिक रुग्णांलयामध्ये व वैद्यकीय महाविद्यांलयामध्ये डिजिटल प्रिस्क्रिप्शन अनिवार्य करणेबाबत

**(१६) ८०८७ (१७-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (एनएमसी) डॉक्टरांना प्रिस्क्रिप्शन (औषध चिठ्ठी) सुस्पष्ट आणि शक्यतो कॅपिटल अक्षरांमध्ये लिहिणे अनिवार्य केले असून, अस्पष्ट हस्ताक्षरामुळे औषधांमध्ये होणारा घोळ थांबवण्यासाठी कडक नियमावली लागू करूनही सदर नियमावलीचे काटेकोर पालन होत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात अनेक डॉक्टरांचे हस्ताक्षर अस्पष्ट असल्याने औषध विक्रेत्यांना औषधे ओळखणे कठीण होते आणि त्यामुळे रुग्णांना चुकीची औषधे किंवा डोस मिळण्याची शक्यता असून मा.उच्च न्यायालयानेही स्पष्ट प्रिस्क्रिप्शन (औषध चिठ्ठी) नसल्यामुळे रुग्णांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो, असे निरीक्षण नोंदवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रिस्क्रिप्शनच्या (औषध चिठ्ठी) गुणवत्तेवर आणि हस्ताक्षराच्या सुस्पष्टतेवर नियमित लक्ष ठेवण्यासाठी विशेष ‘उप-समित्या’ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात येत आहे तसेच मानवी चुका टाळण्यासाठी आणि औषधोपचारात पारदर्शकता आणण्यासाठी ‘डिजिटल प्रिस्क्रिप्शन’ अनिवार्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२२-०६-२०२६) :** (१), (२), व (३) योगेश विरुध्द हरियाणा राज्य या खटल्यात (CRM/M/३०३०५/२०२४) मा.पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाच्या दिनांक २७/०८/२०२५ च्या आदेशानुसार, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने दिनांक १५/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये औषध व उपचार समिती (Drugs and Therapeutics Committee - DTC) अंतर्गत प्रिस्क्रिप्शन पध्दतीचे परीक्षण व देखरेख करण्यासाठी उपसमिती स्थापन करण्याबाबत तसेच वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनमध्ये स्पष्ट व वाचनीय हस्ताक्षराचे महत्त्व अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर निर्देशाची अंमलबजावणी विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये करण्यासाठी दिनांक २०/०२/२०२६ रोजीच्या शासन पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

(४) विभागाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये NIC चे NextGen e-Hospital ही अद्यावत आरोग्य माहिती व्यवस्थापन प्रणाली (HMIS) कार्यरत आहे. सदर प्रणालीद्वारे रुग्णांना डिजिटल प्रिस्क्रिप्शन देण्याची टप्प्या टप्प्याने कार्यवाही सुरू करण्यात येत आहे.

(५)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित खाजगी आयुर्वेद व युनानी संस्थामधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत

**(१७) ८६४० (१८-०५-२०२६) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ शासन अनुदानित खाजगी आयुर्वेद, ३ युनानी व १ आयुर्वेद रुग्णालय अशी एकूण २० महाविद्यालये व संलग्न रुग्णालयात कार्यरत शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाकडून सदर खाजगी संस्थामधील शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वारंवार विनंती करून देखील दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयाचा लाभ अद्यापपर्यंत पात्र कर्मचाऱ्यांना दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयाच्या लाभापासून वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत २० संस्थांमधील कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचारी हे अद्यापही लाभापासून वंचित असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असून आश्वासित प्रगती योजनेंतर्गचे लाभ मिळण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वारंवार शासनास निवेदने देऊनही यावर अद्याप कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कार्यरत व सेवानिवृत्त पात्र अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ वितरित करन्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२),(३) व (४) दिनांक ०८/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील १६ शासन अनुदानित खाजगी आयुर्वेद, ०३ युनानी व ०१ आयुर्वेद रूग्णालय अशी एकूण २० महाविद्यालये व संलग्न रूग्णालयात कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. तथापि, सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत काही तांत्रिक मुद्दे उपस्थित झाले असल्याने सदर प्रकरणी वित्त विभागाकडून अभिप्राय घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेडर रोड, दक्षिण मुंबई येथील शाळेने पालकांनी बस सेवा न घेतल्याने पाल्यांना शिक्षा दिल्याबाबत

**(१८) १४९४० (२५-०८-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळेकडून सांगण्यात आलेली बससेवा न वापरल्याने विद्यार्थ्यांना शिक्षा देण्याचा प्रकार दक्षिण मुंबईतील (South Mumbai School) पेडर रोड येथील एका शाळेत घडल्याचे दिनांक १५ जून, २०२२

रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित शाळेला शिक्षण निरीक्षक कार्यालयाने याबाबत पत्र पाठवले असतानाही शाळेने प्रतिसाद न देता वर्तणूक कायम ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित शाळेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

ॲक्टीव्हिटी हायस्कुल, पेडर रोड, मुंबई या शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेची वाहतूक व्यवस्था न घेतल्यामुळे शाळेने विद्यार्थ्यांचा मानसिक छळ केल्याप्रकरणी श्री.फैजल शेख, उपाध्यक्ष, एन.एस.यु.आय. यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १३/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संबंधित शाळेस सुचना निर्गमित केल्या आहेत.

सदर पत्रान्वये विद्यार्थ्यांना शाळा सुटण्याच्या वेळेनंतर लगेचच पालकांना सुपुर्त करावे, कोणत्याही विद्यार्थ्यांना बसची सक्ती करता येणार नाही व त्या आधारे कोणत्याही विद्यार्थ्यांचा मानसिक छळ होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच विद्यार्थी शाळेत असेपर्यंत वर्गातील लाईट, फॅन सुरुच ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विनाअनुदानित व अंशत: अनुदानित प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/वर्ग तुकड्यांना प्रचलित पध्दतीने अनुदान देण्याबाबत

**(१९) २३५७९ (२२-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.सत्यजीत तांबे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक २१०७१ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयानुसार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय २०%, ४०% व ६०% टक्के अनुदान लागू झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशंतः अनुदानित शळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जून,२०१८ पासून २०% अनुदान लागू झालेले असून या शाळांनी सन २०१९ पासून तर आज पर्यंत वेळोवेळी त्रुटीची पूर्तता केलेली केली असूनही त्यांचे प्रस्ताव मंत्रालयात प्रलंबित असल्याने संचमान्यता दुरूस्ती अभावी वाढीव टप्पा अनुदान मिळत नसल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पार्थ सैनिकी शाळा, जालना या शाळेच्या तुकडीला दिनांक २९ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयद्वारे वाढीव २०% म्हणजे ४०%अनुदान लागू असून यशवंतराव चव्हाण सैनिक शाळा

वाशिम, राजीव गांधी मिलिटरी स्कूल कोलवड (ता.जि.बुलढाणा) व स्व. ईश्वर देशमुख सैनिक शाळा सावंगा (जि.यवतमाळ) यांना वाढीव २०% अनुदान अद्यापही प्राप्त झालेले नाही तसेच टप्पा अनुदानावर काम करणाऱ्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दर महिन्याला उशिराने पगार मिळत असल्याने दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून या शाळांना पुढील वाढीव टप्पा मिळण्याबाबत संघटनांनी रीतसर मागणी व आंदोलन केले असून सदर आंदोलनादरम्यान माननीय मंत्री महोदयांनी दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून पुढील वाढीव टप्पा देणे मान्य केले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व अंशत: अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना यापुढे प्रचलित धोरणानुसार १००% अनुदान, संच मान्यता अभावी वाढीव अनुदान टप्प्यापासून वंचित असलेल्या शाळा/वर्ग तुकड्यांना वाढीव अनुदान टप्पा व माहे मार्च, २०२४ अखेर मुल्यांकनास पात्र ठरलेल्या सर्व शाळा, तुकड्या व कनिष्ठ महाविद्यालये तसेच उक्त सैनिकी शाळाना यांना दिनांक २९ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये वाढीव २०% अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ४ सैनिकी शाळांना अनुदानाचा पुढील वाढीव टप्पा देण्यात आला होता.परंतु मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या बैठकीत अनुदान टप्पावाढ करण्यासंदर्भातील निर्गमित करण्यात आलेला सदरचा शासन निर्णय रद्द करण्यात आला. त्यानंतर दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील खाजगी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा व तुकड्या व त्यावरील कार्यरत शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना टप्पा अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. सैनिकी शाळांचा सदर शासन निर्णयात समावेश करण्यात आलेला नाही.

राज्यातील यशवंतराव चव्हाण सैनिक शाळा, सुपखेला, वाशिम, ईश्वर देशमुख सैनिक शाळा, दिग्रस, राजीव गांधी सैनिक शाळा, बुलढाणा व पार्थ सैनिक शाळा, जालना या सैनिक शाळांच्या अतिरिक्त तुकड्यांना अनुदानाचा पुढील टप्पा देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोकमान्य नगर (ठाणे) येथे सावकारी व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२०) २४४०६ (१५-०२-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील बेकायदेशीर सावकारीला निर्बंध घातलेले असतानाही ठाणे येथील विश्वकर्मा अपार्टमेंट, लोकमान्यनगर (पाडा क्र.४) येथे वास्तव्य करणारे श्री.आर्यन गुप्ता हे सर्वसामान्य नागरिकांना बेकायदेशीररित्या कर्जाचे वाटप करुन कर्जाच्या रकमेवर अधिक व्याज दर आकारत असल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्ज पुरवठाच्या तसेच कर्ज वसूलीच्या कामासाठी श्री.गुप्ता यांनी नेमलेले श्री.शंकर पवार व श्री.आप्पा ढवण हे स्थानिक पोलिसांशी संगनमत असल्याचे दर्शवून कर्जाची परतफेड न करणाऱ्या कर्जदारांच्या घरांचे व मालमत्तांचे खरेदीखत करुन अवैधरित्या हस्तगत करीत आहेत तसेच कर्जदारांना वसूलीसाठी त्रास देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सर्वसामान्य लोकांकडून अधिक व्याज दर आकारून कर्ज देणाऱ्या तसेच कर्जाची परतफेड न केल्यास त्यांची मालमत्ता अवैधरित्या जप्त करणाऱ्या व कर्जदारांना वसूलीसाठी वारंवार त्रास देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०३-०६-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

श्री.आर्यन गुप्ता हे बेकायदेशीर सावकारी करीत असल्याबाबत सहकार आयुक्त कार्यालय तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे अथवा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.